# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/01/2023 (गुरूवार) दुपार

---

## गंभीर दुखापत

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मच्छी मार्केट पाटनसावंगी सावनेर येथे दिनांक ११/०१/२०२३ चे १९.३० वा. ते २०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— क्रिष्णा देवराव मुन, वय ४३ वर्ष, रा. वेलतुर ता. सावनेर यातील हा चिकन सेंटर येथुन चिकन घेऊन जात असतांना जूने भांडणाचे कारणावरून आरोपी क्र. १) मनोज गुलाबराव काळे, २) मनोज काळे याचे दोन अनोळखी मित्र सर्व रा. पाटनसावंगी ता. सावनेर यांनी संगनमत करून फिर्यादीला शिवीगाळ करून आरोपी सोबत असलेले लोकांनी फिर्यादीला खाली पाडले व आरोपी यांनी हातात असलेले लोखंडी वस्तुने फिर्यादीचे तोंडावर डाव्या डोळया खाली व कपाळावर मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२६, ५०४, ५०६, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीतांचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार बंडु कोकाटे पो.स्टे. सावनेर मो. क्र. ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा रामठी येथे दिनांक ११/०१/२०२३ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रज्वल सुधाकरराव चौधरी, वय २३ वर्ष, रा. रामठी म. नरखेड हा रोशन खवसे यांचे घराचे गेटला पेंट मारीत असता यातील आरोपी नामे— १) मंगेश लक्ष्मनराव चौधरी, वय ३३ वर्ष, रा. रामठी वार्ड क्र. १ २) ज्ञानेश्वर भागवत चौधरी, वय ५२ वर्ष, दोन्ही रा. रामठी हे फिर्यादीकडे पाहुन शिवीगाळ करीत असता फिर्यादीने शिवीगाळ का करता म्हणुन हटकले असता आरोपीतांनी ''तु सुरेश चौधरी याला का मारले'' असे म्हणुन अंगावर धावुन आले व दोन्ही आरोपीतांनी हातभुक्कीने मारहाण करुन आरोपी क्र. १) याने फिर्यादीचे डावे हाताला दाताने चावा घेतला तसेच फिर्यादी धक्काभुक्की मध्ये खाली पडला असता आरोपी क्र. १) याने फिर्यादीचे डोक्यावर लाठी मारल्याने डोक्याला डावे बाजुला मार लागला व पुन्हा मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर आरोपीतांचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास मोरेश्वर चलपे ब. नं. १९२२ मो. नं. ९७६७५८१०४४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर